उमेद

# महाराष्ट्र शासन
## उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान,
### ग्रामविकास विभाग,
### जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, बीड
## कार्यालयीन कामासाठी वाहन भाडेतत्वावर घेण्याबाबत.

राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानावर आधारित महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची अंमलबजावणी महाराष्ट्रामध्ये "उमेद" या नावाने सुरु आहे. बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्या मध्ये Intensive पद्धतीने उमेद अभियानाची अंमलबजावणी जिल्हास्तरावर जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, बीड व तालुकास्तरावर तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष यांच्या मार्फत करण्यात येते. **जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष- बीड** या कार्यालयासाठी कार्यालयीन कामकाजासाठी प्रवासी वाहतूक परवाना असलेले एक **स्कार्पिओ /तवेरा / इनोवा / महिंद्रा TUV /Xylo** किंवा समतुल्य वाहन **मासिक (Monthly )** एक वर्षाकरिता भाडेतत्वावर व **गरजेनुसार (on call basis )** लागणारी वाहने दर करार या भाडेतत्वावर घेणे आहे. त्याकरिता वाहन पुरवठादार / एजन्सी यांच्याकडून ई-मर्यादित निविदा (Limited e-tender) प्रणाली द्वारे निविदा मागविण्यात येणार आहे. सदर निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी वाहन पुरवठादार/संस्था यांचाकडे खालील बाबी असणे आवशक आहे.

१. DSC (Digital Signature Certificate),
२. https://mahatenders.gov.in या संकेतस्थळ/पोर्टल वर नोंदणीकृत असावा,
३. स्वतःच्या नावावर वर नमूद केलेल्या पैकी कमीत कमी १ प्रवासी वाहतूक परवाना असलेले सन **डिसेंबर २०१५** नंतर चे नोंदणीकृत असलेले वाहन असावे. (४) PAN कार्ड असावे,
५. शासकिय /निमशाकीय कार्यालये / सहकारी संस्था / कंपनी यांना पुरवठा करण्याचा कमीत कमी १ वर्षाचा अनुभव असावा

वरिल अटींची पूर्तता करणा-या इच्छुक वाहन पुरवठादार यांनी वर नमूद केलेल्या कागदपत्रासह व **http://www.umed.in** किंवा सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या अर्जाच्या नमुन्यात खाली दिलेल्या पत्यावर वर दि. 21 / 06 /2018 दुपारी ३.०० वाजेपर्यंत अर्ज वरील सर्व कागद पत्रा सह करण्यात यावा. कोणत्याही कारणास्तव मुदतीनंतर प्राप्त होणा-या अर्जाचा सदर ई-निवीदा प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेता येणार नाही याची कृपया नोद घ्यावी. सदर निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक वाहन पुरवठादार यांच्याकडुन कोणतीही निविदा शुल्क व EMD घेण्यात येणार नाही. अर्ज सादर करण्याच्या मुदतीत किंवा इतर बाबींमध्ये काही बदल झाल्यास त्याबाबतची सूचना **http://www.umed.in** या संकेत स्थळावर किंवा कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल तसेच कोणतेही कारण न देता सर्व अर्ज रद्द करणे अथवा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार खाली स्वाक्षरी करणार यांनी राखून ठेवण्यात आलेले आहे .

**मुख्यकार्यकारी अधिकारी, जि.प. बीड तथा जिल्हा अभियान संचालक,**
**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोनन्ती अभियान, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, बीड**

**कार्यालयाचा पत्ता:उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोनन्ती अभियान,**
**जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा ( DRDA) ,**
**दीप हिरो शो रूम च्या वरती, नगर रोड, बीड. फोन ०२४४२-२२६६७७. इमेल - dmmubeed@gmail.com**

Scanned by CamScanner

**अर्जाचा नमुना**

दिनांक :

प्रती,

**मा.जिल्हा अभियान संचालक** तथा

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. बीड

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा ( DRDA) ,

दीप हिरो शो रूम च्या वरती, नगर रोड, बीड.

**विषय : मासिक व मागणी तत्वावर लावण्याच्या वाहनाच्या निविदा प्रक्रियेसाठी लागणारी माहिती सादर करण्याबाबत**

संदर्भ : आपली दिनांक / /२०१८ रोजी --------------------- वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेली जाहिरात

**महोदय,**

वरील विषयास अनुसरून मी /आम्ही मासिक व मागणी तत्वावर ( On Call Basis) लावण्याच्या वाहनाच्या निविदा प्रक्रियेसाठी लागणारी माहिती खाली प्रमाणे सादर करीत आहोत.

| अ क्र | विवरण | माहिती |
|---|---|---|
| १ | संस्थेचे / पुरवठादाराचे नाव | |
| २ | संपूर्ण पत्ता (इमेल सह ) | |
| ३ | आपणाकडे D.S.C. आहे काय?<br>(digital signature certificate ) | |
| ४ | आपली संस्था mahatenders.gov.in या संकेतस्थळावर नोंदणीकृत आहे का?<br>असल्यास **registered id** नमूद करावा | |
| ५ | Pan card आहे का? | |
| ६ | आपणाकडे Shop & Establishment Act अंतर्गत नोंदणीकृत असल्याचे प्रमाणपत्र आहे काय? | |
| ७ | आपणाकडे सन डिसेंबर 2015 नंतरचे (मॉडेल) जाहिरीती मध्ये नमूद केल्यानुसार स्कर्पिओ /तवेरा / Ertiga / इनोवा / महिंद्रा TUV किंवा समतुल्य वाहन या पैकी एक - भाडेतत्वावर देण्यासाठी स्वतःची किती व कोणती वाहने आहेत ? | |
| ८ | आपणाकडे स्वतःची प्रवासी परवाना(tourist permit) असलेली वाहने आहेत का? असल्यास किती आहेत व कोणती आहेत? | |
| ९ | आपल्याकडे शासकीय/अशासकीय/इतर संस्थाना वाहने भाडेतत्वावर पुरवठा करण्याचा अनुभव आहे का? असल्यास किती वर्षाचा आहे? | |

वर नमूद केलेली माहित हि खरी असल्याची मी खात्री देतो

पुरवठादाराचे नाव व सही

संपर्क क्र